# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२१ दि. ३१ जुलै, २०२१

(कृपया, आपल्या दैनिकाच्या जळगाव,धुळे व नंदूरबार आवृत्तीतून बातमी प्रसिध्द करावी, ही विनंती.)

जळगाव दि. ३१ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ प्रशाळा व संलग्नित महाविद्यालयातील एम.एस्सी. (सर्व विषय) आणि एम.एस्सी. / एम.ए. (भूगोल) प्रथम वर्ष या पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विविध विषयांसाठी केंद्रीय पध्दतीने ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया शनिवार, दि. ३१ जुलै पासून सुरू झाली असून त्याचे माहितीपत्रक (ब्राऊचर), ऑनलाईन माहिती व नोंदणी अर्ज विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या www.nmu.ac.in संकेतस्थळावर ऑनलाईन उपलब्ध करून देण्यात आले आहे.

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ या करीता एम.एस्सी. (सर्व विषय) आणि एम.एस्सी. / एम.ए. (भूगोल) प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन सुरु करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांनी त्यांचा User ID/Password तयार करून Registration करावे. विद्यार्थ्यांनी नोंदणी शुल्क रू.३००/- ऑनलाईन द्वारे भरणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना ऑनलाईन नोंदणी अर्ज दि. ३१ जुलै २०२१ ते २१ ऑगस्ट, २०२१ या कालावधीत भरता येतील. प्रवेश अर्ज स्विकृती केंद्रानी ऑनलाईन भरलेल्या अर्जांचे ई-व्हेरीफिकेशन दि.२२ ऑगस्ट २०२१ पर्यंत करावे.

सदर केंद्रीय प्रवेश प्रकियेच्या ऑनलाईन तीन फेऱ्या (राऊंड) होतील. प्रवेश नोंदणी प्रक्रीया पूर्ण झाल्यावर, प्राथमिक गुणवत्ता यादी जाहीर होईल. त्यानंतर गुणवत्ता यादीवर काही आक्षेप असल्यास ते नोंदवता येतील. त्यानंतर अंतीम गुणवत्ता यादी जाहिर केली जाईल. प्रवेशासाठी पहिली, दुसरी, व तिसऱ्या फेरीचे वेळापत्रक विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर वेळोवेळी जाहीर केले जाईल. ऑनलाईन अलॉटमेंटसाठी ऑप्शन फॉर्म भरतांना विद्यार्थ्यांनी कमीत कमी एक ऑप्शन भरणे बंधनकारक असून जेवढी महाविद्यालये आहेत तितके Preference विद्यार्थी भरू शकतो. केंद्रीय प्रवेश पध्दतीने ऑनलाईन अलॉटमेंट करण्यात येईल. पहिल्या फेरीनंतर विद्यार्थ्यांला त्याच्या पसंतीप्रमाणे महाविद्यालय न मिळाल्यास Freeze आणि Float असे दोन पर्याय देण्यात आलेले आहेत.

ई-व्हेरिफिकेशनसाठी ऑनलाईन भरलेले अर्ज विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज स्वीकृती केंद्र (ARC) केंद्रावर अपलोड करावेत. प्रवेश अर्ज स्वीकृती केंद्र पुढीलप्रमाणे:- ऑनलाईन परीक्षा केंद्र, गणित प्रशाळा, कबचौउमवि, जळगाव, जी.डी.बेंडाळे महिला महाविद्यालय, जळगाव, भुसावळ कला, विज्ञान आणि पी.ओ.नाहाटा वाणिज्य महाविद्यालय, भुसावळ, धनाजी नाना चौधरी कला व विज्ञान महाविद्यालय, फैजपूर, महात्मा गांधी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, चोपडा, राष्ट्रीय स.शि.प्र.मंडळाचे य.ना. चव्हाण कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, चाळीसगाव, एस.एस.व्ही.पी.एस.चे कै.पां.रा. घोगरे

विज्ञान महाविद्यालय, धुळे, आर.सी.पटेल कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, शिरपूर, सि.गो.पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, साक्री, जी.टी.पी. कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नंदूरबार, पी.एस.जी.व्ही.पी.एस.कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, शहादा, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय नवापूर असे एकूण बारा केंद्र प्रवेश अर्ज स्विकृतीसाठी निश्चित करण्यात आलेले आहेत. एम.एस्सी./एम.ए.(भुगोल) या अभ्यासक्रमांना प्रवेश घेऊ इच्छीणाऱ्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (www.nmu.ac.in) भेट देवून प्रवेशासंबंधीतची सविस्तर माहिती समजून घ्यावी, ऑनलाईन संदर्भात काही अडचण आल्यास दूरध्वनी क्र. ०२५७-२२५७१५८ किंवा ई-मेल cap@nmu.ac.in यावर संपर्क साधावा. अशी माहिती ऑनलाईन केंद्रीय प्रवेश प्रक्रिया समितीचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. आर.एस. पाटील यांनी दिली आहे.

---

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,
महोदय,

उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिद्ध करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

जनसंपर्क अधिकारी करीता